जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JUN 2026
तरुण भारत

# विद्यापीठातील अभ्यासक्रमाचा वार्षिक बृहत आराखडा तयार

त. भा. प्रतिनिधी



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अभ्यासक्रमाच्या सन २०२६-२७ चा वार्षिक बृहत आराखडा तयार केला असुन तो शिवाजी विद्यापीठाच्या www.Unishivaji.ac.in - Affiliation - Affiliation T-2 Circulars या लिंकवर उपलब्ध करण्यात आला असल्याची माहिती संलग्नता टी-२ विभागाचे उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी दिली.

त्यामध्ये सन २०२७-२८ साठीचे शासनास शहर व तालुका निहाय अभ्यासक्रमानुसार बिंदू दर्शविण्यात आलेले आहेत. तसेच सध्या संबंधित शहर व तालुक्यामध्ये कोणती महाविद्यालये आहेत. व त्यामध्ये कोणते अभ्यासक्रम सुरु आहेत यांची माहिती दिलेली आहे. त्याच बरोबर पंचवर्षिक बृहत आराखडयामध्ये शिल्लक बिंदू त्या तक्त्यामध्ये नमूद केलेले आहेत. शिल्लक स्थळबिंदूमधुन नियमानुसार एखादा स्थळबिंदू घ्यावयाचा असल्यास कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या नावे अर्ज करु शकता. सदरचे अर्ज सोमवार दि.८ रोजीपर्यंत विद्यापीठ कार्यालयास (संलग्नता टी - २ विभागास) देण्यात यावे. विलंबाने प्राप्त होणाऱ्या अर्जावर कार्यवाही केली जाणार नाही, असे अवाहन शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JUN 2026
जनप्रवास

# विद्यापीठाचा सन २०२६-२७ चा वार्षिक बृहत आराखडा तयार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा सन २०२६–२७ चा वार्षिक बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे. हा आराखडा विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. संकेतस्थळः www.unishivaji.ac.in Affiliation Affiliation T-2 Circulars. या आराखड्यामध्ये सन २०२७–२८ साठी शासनमान्य शहर व तालुकानिहाय अभ्यासक्रमनुसार बिंदू दर्शविण्यात आले आहेत. तसेच संबंधित शहर व तालुक्यातील महाविद्यालयांची माहिती आणि त्या महाविद्यालयांमध्ये सुरू असलेल्या अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आलेली आहे. यासोबतच पंचवार्षिक बृहत आराखड्यामधील शिल्लक बिंदू देखील नमूद करण्यात आले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JUN 2026

जनप्रवास

# शरद इंजिनिअरिंगच्या ७ विद्यार्थ्यांची बेलराईज इंडस्ट्रीजमध्ये निवड

जयसिंगपूर : यड्राव येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या ७ विद्यार्थ्यांची बेलराईज इंडस्ट्रीज लिमिटेड या नामांकित कंपनीत निवड झाली. महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड कॉम्प्युटर व इलेक्ट्रीकल या विभागातील विद्यार्थ्यांची निवड झाली. कंपनीमध्ये इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड कॉम्प्युटर विभागातील समिक्षा मगदूम, उत्कर्ष ऐतवडे, शिवानी बुबणे, इलेक्ट्रीकलमधील मिताली वाडकर, संध्या कोळी, भावना शिंगे, सक्षता बन्ने ह्या विद्यार्थ्यांना संधी मिळाली आहे. चेअरमन आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर, अनिल बागणे यांनी अभिनंदन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. बी. बी. संगमे, प्रा. नेहा प्रसुन, प्रा. ए.बी. जाधव, डॉ. विद्या पाटील, प्रा. प्रियाका कबाडे यांच्यासह सर्व डिन, विभागप्रमुख, शिक्षक-यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 3 JUN 2026

सकाळ

# विद्यापीठातील प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांमधील पदव्युत्तर अभ्यास केंद्रांतील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यातील प्रवेश परीक्षा झालेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या पहिल्या फेरीची मुदत उद्या, बुधवारपर्यंत आहे. रसायनशास्त्रासाठी उद्या आणि गुरुवारी प्रवेश प्रक्रिया होणार आहे. दुसऱ्या फेरीची प्रक्रिया ८ जूनपासून सुरू होईल. या फेरीअंतर्गत प्रवेश निश्चितीची मुदत १० जूनपर्यंत आहे. प्रवेश परीक्षा नसलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची प्रक्रिया ६ ते ८ जूनदरम्यान होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JUN 2026

सकाळ

# विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा केंद्राबाबत आवाहन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात प्रवेश परीक्षा अर्ज ऑफलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. परीक्षेचे अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर युजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पेटिटिव्ह एक्झामिनेशन्स् येथे आहे. अर्ज केंद्राच्या कार्यालयातही उपलब्ध आहेत. हे अर्ज भरून आवश्यक कागदापत्रांसहित कार्यालयात २० जूनला सायंकाळी सहावाजेपर्यंत जमा करावेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JUN 2026
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ५८० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील मंगळवारी या २८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आले आहे. मंगळवारी विविध २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ७७ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ७१७८ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून मंगळवारी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकारांची नोंद करण्यात आली नाही. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे

03 JUN 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरच्या नागरिकांना आठ लाख झाडांची सावली

## वर्षाला चार लाखांचा खर्च : नव्या दहा हजार झाडांची पडते भर

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** यंदाच्या उन्हाळ्याने संपूर्ण राज्याचा घाम काढला असला तरी त्या तुलनेत कोल्हापूरचे तापमान काहीअंशी कमीच होते. येथील भौगोलिक परिस्थितीने उन्हाची तीव्रता रोखली असली तरी त्याला शहरातील 'लाख' मोलाच्या झाडांचाही हातभार लागला आहे. शहरात तब्बल साडेसात ते ८ लाखांच्या आसपास झाडे असून, या झाडांच्या सावलीनेच इथला गारवा अधिक समृद्ध केला आहे.

कोल्हापूर हा पश्चिम घाटाच्या कुशीत वसलेला जिल्हा असल्याने जैवविविधतेने नटला आहे. राधानगरी अभयारण्य, शाहूवाडी, पन्हाळा आणि गगनबावडासारख्या परिसरातील घनदाट जंगले, उद्याने, वृक्षराजी पर्यटकांना आणि स्थानिकांना उन्हाळ्यात सुखद गारवा देतात. ग्रामीण भागातील हीच हरित जैवविविधता कोल्हापुरातही पाहायला मिळते. यासाठी महापालिकेने मोलाची भर घातली आहे. महापालिकेच्या वतीने वृक्षसंवर्धन व लागवडीसाठी उपक्रम राबविले जातात. त्याअंतर्गत प्रत्येक वर्षी ९ ते १० हजार झाडांचे रोपण केले जाते.

सामाजिक वनीकरणकडून ५० टक्के झाडे घेतली जातात. निम्मी झाडे महापालिका रोपवाटिकेतून विकत घेते. यासाठी महापालिकेतर्फे प्रत्येक वर्षी चार ते साडेचार लाखांचा खर्च करण्यात येतो. यंदाही महापालिकेने दहा हजार झाडे लावण्याचे नियोजन केले आहे.

### वृक्षांबाबत कोल्हापूर समृद्ध

उन्हाळ्यात संपूर्ण राज्य उष्णतेने हैराण होत असताना कोल्हापूरचे तापमान मात्र, नेहमीच कूल कूल राहत होते.

**गेल्या काही वर्षांपासून जागतिक तापमानातच वाढ झाल्याने कोल्हापूरचा उन्हाळाही हैराण करणारा ठरत आहे. असे असले तरी इतर शहरांपेक्षा कोल्हापूरचे तापमान कमीच असते.**

इतर शहरांपेक्षा कोल्हापुरात झाडांची संख्या अधिक असल्याने तापमानावर त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येतो.

**४ लाखांचा**

खर्च महापालिकेतर्फे प्रतिवर्षी केला जातो. पिंपळ, गुलमोहोर, बहावा, करंज, चिंच, कडुनिंब या झाडांना प्राधान्य दिले जात असल्याने सावली अधिक वाढत आहे.

**कोल्हापूर शहरात सात ते आठ लाखांच्या आसपास झाडांची संख्या आहे. प्रत्येक वर्षी ७ ते ८ हजार झाडे लावली जातात. त्यांचे संवर्धनही चांगल्या पद्धतीने होत असून, शहर वृक्षांच्या बाबतीत समृद्ध होत आहे.**

**समीर व्याघ्रांबरे**, उद्यान अधीक्षक, कोल्हापूर महापालिका

कोल्हापूर हे पर्यावरण समृद्ध शहर आहे. परिसरात डोंगराळ प्रदेश, पंचगंगा नदी परिसर, रंकाळा व कळंबा तलाव, शिवाजी विद्यापीठातील हिरवाई तसेच शहरात वृक्षसंपदा जास्त आहे. म्हणून कोल्हापूरचे तापमान यंदा ४० अंश सेल्सिअसच्या आत राहिले.

**डॉ. युवराज मोटे**, भूगोल व पर्यावरण अभ्यासक, कोल्हापूर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JUN 2026
पुढारी

Estd 1962 "A++" Accredited by NAAC(2021) WITH CGPA3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## E-Tender Notice No. SUK_2026-27/208

Shivaji University invites online tenders for **Providing Unskilled Labour on Contractual basis for Botanical Garden as per minimum wages act for three years.** Relevant tender documents are available on web-site **http://mahatenders.gov.in** Interested parties should submit online tenders accordingly by getting their firm's name registered with above said URL .University reserves Right of Negotiation and also to accept or reject any or all tenders without assigning any reason. **Last date of Tender submission dt.15/ 06/2026 upto 5-00 p.m.**

SU/Stores
Date :- **03 / 06/ 2026**

**Dr. V. N. Shinde**
Registrar

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JUN 2026
पुढारी

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Estd : 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

(1st Extension)

Proposal are invited from interested experienced parties, for repair, maintenance and commissioning of existing Bio-Gas plants at Department of Technology and Vidhyarthi Bhavan in Shivaji University campus by the Registrar, Shivaji University, Kolhapur. Relevant information and terms and conditions are available on University's web-site www.unishivaji.ac.in at (Other Quotation / Tenders List). Interested parties who are willing to comply with the terms and conditions published should submit offline proposals in Inward Section, Shivaji University, Kolhapur. **Last date of proposal submission is 08/06/2026 upto 05:30 pm.**

**Note:-** Right to accept or reject any or all the tenders is reserved by the University without assigning any reason.

Su/Engg/Civil
Date:-03/06/2026

**Dr. V. N. Shinde**
Registrar

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JUN 2026
सकाळ,

Est: 1962
"A++ Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## (1st Extension)

Proposal are invited from interested experienced parties, for repair, maintenance and commissioning of existing Bio-Gas plants at Department of Technology and Vidhyarthi Bhavan in Shivaji University campus by the Registrar, Shivaji University, Kolhapur. Relevant information and terms and conditions are available on University's web-site www.unishivaji.ac.in at (Other Quotation / Tenders List). Interested parties who are willing to comply with the terms and conditions published should submit offline proposals in Inward Section, Shivaji University, Kolhapur. **Last date of proposal submission is 08/06/2026 upto 05:30 pm.**

Note:- Right to accept or reject any or all the tenders is reserved by the University without assigning any reason.

Su/Engg/Civil
Date:-03/06/2026

**Dr. V. N. Shinde**
**Registrar**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JUN 2026
तरुण भारत

Estd 1962 "A++" Accredited by NAAC(2021) WITH CGPA3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**

**E-Tender Notice No. SUK_2026-27/208**

Shivaji University invites online tenders for **Providing Unskilled Labour on Contractual basis for Botanical Garden as per minimum wages act for three years**. Relevant tender documents are available on web-site http://mahatenders.gov.in Interested parties should submit online tenders accordingly by getting their firm's name registered with above said URL .University reserves Right of Negotiation and also to accept or reject any or all tenders without assigning any reason. **Last date of Tender submission dt.15/ 06/2026 upto 5-00 p.m.**

SU/Stores

Date :- **03 / 06/ 2026**

**Dr. V. N. Shinde**
Registrar